शुक्रवार, दि. १७ जून, २०२२

## आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला

## विषय - प्रा. डॉ. एन. डी. पाटील आणि प्रबोधन चळवळी

## वक्ते – मा. प्रसाद कुलकर्णी

### अहवाल

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी, कृतिशील विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या कार्याची महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना ओळख व्हावी, या उद्देशाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

या उपक्रमातील तिसरे व्याख्यान मा. प्रसाद कुलकर्णी यांचे झाले. 'प्रा. डॉ. एन. डी. पाटील आणि प्रबोधन चळवळ' या विषयावर बोलताना मा. प्रसाद कुलकर्णी म्हणाले, ''डॉ. एन. डी. पाटील यांच्या विचारांवर छत्रपती शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स, महात्मा फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा आदींचा मोठा प्रभाव होता. या विचार परंपरेने समाजातील शेवटच्या माणसाच्या उत्थानाचा विचार केलेला आहे.एन.डी.सरांनी त्याच धाग्याची वीण समकालीन प्रश्नांसोबत अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला. राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांची वैचारिक प्रगल्भता वाढली पाहिजे याकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले.मार्क्सच्या परिभाषेत राजकारणाच्या व समाजकारणाच्या क्षेत्रात 'तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य' असता कामा नये असे त्यांचे मत होते. म्हणूनच त्यानी सैद्धांतिक प्रबोधन करणाऱ्या समाजवादी प्रबोधिनीच्या स्थापनेत आचार्य शांताराम गरुड, शहीद गोविंद पानसरे आदींसह हिरीरीने पुढाकार घेतला. आणि त्या कार्यात ते अखेरपर्यंत सक्रिय होते. त्यानंतर रयत शिक्षण संस्था,अंधश्रद्धा निर्मूलन समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी अशा अनेक संस्थांचे नेतृत्व त्यांनी केले.एन.डी. सरांच्या सर्व राजकारणाला, समाजकारणाला, लढ्याला, आंदोलनाला, प्रबोधनाचे व्यापकअधिष्ठान होते. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द आणि लिहिलेले प्रत्येक वाक्य हा महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीचा अनमोल ठेवा आहे. तो ठेवा अंगीकृत करून ,स्वतः प्रबोधित होऊन प्रबोधन करत राहणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.'' कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम लाभले होते. अध्यक्षीय मनोगतात म्हणाले साधी राहणी व उच्च विचारसरणी हे एन.डी.साहेबांचे वैशिष्ट्ये होते. त्यांनी समाजाकडून घेण्यापेक्षा समाजाला देण्याची शिकवण आपल्याला दिली आहे. त्यांची ही विचारधारा पुढे घेऊन पुढे जाणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.''

सदर कार्यक्रम यशास्वीपणे पार पाडण्यासाठी मराठी विभागाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. बबन पाटील यांनी केला. आभार मराठी विभागप्रमुख दिलीप कोने यांनी मानले; तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या प्रबोधन कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** 082





विभागप्रमुख

मराठी विभाग प्रमुख,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

प्राचार्य

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.